-49-

शासकीय अधिकाऱ्यास/कर्मचाऱ्यास उत्कृष्ट कामा-
निमित्त आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०८४/के. नं.८/आठ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १९ फेब्रुवारी १९८४.

वाचा :- (१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७२/ड,
दिनांक ११ फेब्रुवारी १९७४.

(२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७६/१३,
दिनांक १० ऑगस्ट १९७६.

शासन परिपत्रक :- शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक एसआरव्ही-१०७६/१३, दिनांक १० ऑगस्ट १९७६ अन्वये विहित केलेले विवरणपत्र सुधारण्याचा प्रश्न या विभागाच्या विचाराधीन होता. या विभागाने सांगोपांग विचार करुन सदर विवरणपत्रामध्ये आवश्यक सुधारणा केल्या असून सुधारित विवरणपत्र यासोबत जोडले आहे.

२. सर्व मंत्रालयीन विभाग व विभाग प्रमुखांना विनंती करण्यात येते की, आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव करताना सोबत जोडलेल्या विवरणपत्रातील बाबी विचारात घ्याव्यात. तसेच वर्ग १ व वर्ग २ च्या अधिकाऱ्यांना, आगाऊ वेतनवाढी मंजूर करण्याबाबतचे प्रस्ताव शासनाकडे पाठविताना या परिपत्रकान्वये विहित केलेल्या विवरणपत्रातील माहिती, संबंधित अधिकाऱ्याच्या अद्ययावत गोपनीय अहवालाच्या प्रतीसह पाठवावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

जिल्हाधिकारी रत्नागिरी
-कार्यालय-
10 APR 1984
शाखा - ES
10/4/1984 1366

मु. पु. माने,
कार्यासन अधिकारी,
महाराष्ट्र शासन.

1366

प्रति

सर्व मंत्रालयीन विभाग,